# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | गुरुवार , दि. २६ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १३४ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१८९६ : सुप्रसिद्ध कादंबरीकार र.वा. दिघे यांचा जन्म.

१८९८ : शिवराम परांजपे यांनी साप्ताहिक 'काळ' चा पहिला अंक काढला.

१९९३ : सुप्रसिद्ध लेखक मधुकर केचे यांचे निधन झाले.

१९३३ : अंतराळ संशोधक वसंतराव गोवारीकर यांचा जन्म

सेन्सेक्स ७४,५३२.९६ +३२५.७२ (०.४४%)

डॉलर ₹ ९४.०१

**आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)**

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३७ | १८ |
| दिल्ली | ३० | १८ |
| मुंबई | ३७ | २४ |
| नागपूर | ३५ | १९ |
| पुणे | ३८ | १६ |

**सुविचार**

प्रेम ही भाषा जगातील प्रत्येक जीव आणि प्राणी समजू शकतो

सूर्योदय - सूर्यास्त

स.-६:२९ संध्या-६:४०

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)

१,५१,६९५/- २,४५,०००/-

# महिला उद्योजिका भारताच्या विकासाचा कणा

## उद्योजिका कार्यशाळा, प्रदर्शनात पणन मंत्री जयकुमार रावल यांचे प्रतिपादन

वृत्तसंस्था । मुंबई

**महिलांचे आर्थिक सबलीकरण हाच भारताच्या विकासाचा कणा असून महिलांनी मोठ्या संख्येने उद्योग-व्यवसायात उतरावे, असे आवाहन वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने उद्योजिका कार्यशाळा व प्रदर्शनात पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केले. ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज आणि गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले होते..**




पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, उत्पादन, सेवा, शेतीआधारित उद्योग आणि निर्यात अशा सर्व क्षेत्रांत महिला उद्योजिका रोजगारनिर्मिती, नवोन्मेष आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देत आहेत. या प्रयत्नांना बाजारपेठ मिळवून देण्यावर भर देण्यात येत आहे. गव्हर्नमेंट ई-मार्केट प्लेस या डिजिटल पोर्टलमुळे लहान उद्योग, स्टार्टअप्स आणि विशेषत: महिला चालवित असलेल्या उद्यमांना देशभरातील सरकारी खरेदी प्रक्रियेत थेट सहभागी होता येते. छोट्या शहरातील महिला उद्योजिकेलाही आता देशातील कोणत्याही शासकीय विभागात आपला माल व सेवा पुरविण्याची संधी मिळत असल्याने गव्हर्नमेंट ई-मार्केट प्लेस हा विकास आणि राष्ट्रीय मान्यतेकडे जाणारा प्रभावी मार्ग ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार महिलांच्या उद्योजकतेला बळकटी देण्यासाठी बाजार जोडणी, डिजिटल प्रवेश, आर्थिक समावेशन आणि कौशल्य विकास यावर भर देत असल्याचे पणन मंत्री रावल यांनी सांगितले. पणन विभागामार्फत आशियाई विकास बँकेच्या सहाय्याने सुमारे २ हजार कोटी रुपयांचा मॅग्नेट हा कापणी पश्चात विकास प्रकल्प राबविण्यात येत असून, द्राक्षांपासून मनुका, प्राथमिक प्रक्रिया, पॅकेजिंग, ब्रँडिंग आणि विक्री यासारख्या उपक्रमांसाठी ६० टक्क्यांपर्यंत प्रोत्साहन दिले जात आहे. ग्रामीण भागातील महिला स्वयंसहाय्यता गटांना सातत्याने बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती (पान २ वर)

**● महिला आरक्षण विधेयक हे केंद्र सरकारचे एक ऐतिहासिक पाऊल असून, आगामी काळात संसद व विधानमंडळांत एक तृतीयांश महिला प्रतिनिधींना महत्त्वाची स्थानं मिळाल्याने निर्णय प्रक्रियेत महिलांचा प्रभाव वाढेल.**

**महिलेचे यश हे कुटुंब, समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीचे साधन ठरते; ते महाराष्ट्राचे बळ आणि भारताच्या विकासकथेचा भाग आहे. त्यामुळे महिला उद्योजिकांनी आत्मविश्वासाने पुढे यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.**

### ➢ खरेदी प्रक्रियेबाबत जागृती

**या कार्यशाळा प्रदर्शनामुळे महिला उद्योजकांसाठी ई-मार्केट प्लेस प्लॅटफॉर्मवर प्रवेश सुलभ होणे, शासकीय खरेदी प्रक्रियेबाबत जागृती वाढणे, ब्रँडिंग आणि निर्यातसिद्धतेबाबत क्षमतावृद्धी होणे, तसेच धोरणकर्ते, उद्योगनेते आणि मार्गदर्शक यांच्याशी थेट नेटवर्किंगची संधी उपलब्ध झाल्याची माहिती यावेळी उपस्थित महिलांना देण्यात आली. यावेळी उद्योजक महिलांची उपस्थिती लक्षणिय होती.**

## थोडक्यात



### राज्यातील ५१ विद्यार्थी देणार नासाला भेट

**मुंबई ।** राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण व्हावा, त्यांना विज्ञानाची गोडी लागावी यासाठी शालेय शिक्षण विभागातर्फे दरवर्षी राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. या प्रदर्शनामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पारितोषिकांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे. त्यापाठोपाठ या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ५१ विद्यार्थ्यांना अमेरिकेच्या नासा केंद्राला भेट देता येणार आहे.

### रुपाली चाकणकरांच्या पक्षपदावरही टांगती तलवार

**नाशिक ।** अशोक खरात याच्या कृष्णकृत्याचे वेगवेगळे पैलु समोर येत असतांना या त्याच्या दुष्कृत्याला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पाठिंबा देणाऱ्या राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकरांना खरात यांच्याशी असलेल्या जवळिकीमुळे राष्ट्रवादी महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा चाकणकर यांनी द्यावा, अशी मागणी होत आहे.

# महाराष्ट्रातील पर्यटनाच्या जागतिक ब्रँडिंगसाठी व्यापक आराखडा तयार करणार

प्रतिनिधी। मुंबई

**राज्यातील पर्यटन विकासासाठी व्यापक आराखडा तयार करण्यात येत असून महाराष्ट्राचे आंतरराष्ट्रीय स्तरावर ब्रँडिंग करण्यावर भर दिला जाणार आहे. महाराष्ट्राला देशातील अग्रक्रमाचे पर्यटन राज्य बनवण्यासाठी ठोस पावले उचलले जातील, असे पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदराष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत टू-डी-इको शिबिरांचे आयोजन करण्यात आले. विविध सदस्यांनी पर्यटन विभागासंदर्भात मांडलेल्या सूचनांचा सकारात्मक विचार केला जाईल, असे नमूद करत मंत्री देसाई म्हणाले, गतवर्षी पर्यटन विभागासाठी सुमारे १५००



कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी मोठ्या प्रमाणावर निधी वितरित झाला असून यंदाच्या (पान २ वर)

# आगीमुळे बाधित पिकांना भरपाई देण्यासाठी लवकरच धोरणात्मक निर्णय

प्रतिनिधी । मुंबई

**वाशिम जिल्ह्यात घडलेल्या आग प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या नुकसानीची शासनाने गांभीर्याने दखल घेतली असून आगीमुळे नुकसान झालेल्या पिकांना भरपाई देण्यासाठी लवकरच धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी विधानसभेत दिली.**

राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल म्हणाले की, विद्यमान धोरणानुसार उभ्या पिकाच्या नुकसानीस भरपाई दिली जाते., मात्र कापलेल्या पिकाला (पान २ वर)

### ➢ मंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांची घोषणा



**केंद्र शासनाने नैसर्गिक आपत्ती यादीत तसेच राज्याच्या आपत्ती व्यवस्थापनात आकस्मिक आगीचा समावेश असला तरी त्याची स्पष्ट व्याख्या नसल्याने अडचणी निर्माण होत आहेत. यासंदर्भात केंद्र शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले असून त्यावर लवकरच निर्णय होण्याची अपेक्षा आहे. केंद्राकडून मदत मिळाली नाही तरी राज्यस्तरावर आपत्ती घोषित करून मंत्रिमंडळाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल, असेही राज्यमंत्री ॲड. जयस्वाल यांनी नमूद केले.**

# तृतीयपंथीयांना स्वावलंबनासाठी ४५ टक्के सबसिडीसह दोन लाखांपर्यंत कर्ज!



### जामीनदार किंवा तारण आवश्यक नाही

तृतीयपंथीयांसाठी राबविण्यात येणाऱ्या बीज भांडवल योजनेतील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे संबंधितांना कर्जासाठी कोणत्याही प्रकारचा जामीनदार किंवा तारणाची आवश्यकता नाही. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या तृतीयपंथीय व्यक्तींना या योजनेचा लाभ घेणे सुलभ झाले आहे. या माध्यमातून लघुउद्योग, सेवा व्यवसाय, किरकोळ व्यापार, हस्तकला, शिवणकाम, ब्युटी पार्लर, मोबाईल दुरुस्ती यांसारखे व्यवसाय सुरू करण्यास प्रोत्साहन मिळेल.

वृत्तसंस्था । जळगाव

तृतीयपंथीयांच्या आर्थिक उन्नतीसाठी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत बीज भांडवल योजना राबविण्यात येणार आहे.

जळगाव जिल्ह्यातही तृतीयपंथीयांना स्वावलंबनाची नवी संधी देणाऱ्या या योजनेची अंमलबजावणी सुरू झाली आहे. पात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाजकल्याण विभागाच्या सहायक आयुक्त कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

१३ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार, तृतीयपंथीयांसाठीच्या बीज भांडवल योजनेचा उद्देश तृतीयपंथीय व्यक्तींना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे (पान २ वर)

### अजित पवारांच्या विमान अपघाताची कसून चौकशी

वृत्तसंस्था । मुंबई

मुंबई : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणावर आज विधानसभेत निवेदन मांडलं. यावेळी त्यांनी अपघात प्रकरणात आतापर्यंत काय-काय तपास झाला आणि तपासातून काय माहिती मिळाली, याबाबत सविस्तर विश्लेषण केलं. यावेळी त्यांनी आमदार रोहित पवार यांच्या आरोपांना देखील प्रत्युत्तर दिलं. अपघात प्रकरणी सखोल तपासाचं आश्वासन दिलं. जो दोषी असेल त्याला शोधून काढू,

# अशोक खरातचे अनेक कांड बाहेर येत आहेत

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानसभेत माहिती

वृत्तसंस्था । मुंबई

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुन्हा एकदा विधानसभेत भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावर भूमिका मांडली. विकृत भोंदूबाबा अशोक खरात याच्या प्रकरणी काल मी सविस्तर निवेदन दिलं आहे. मी सर्वांना विनंती करेन की, ज्यांच्याकडे या प्रकरणाची माहिती आली असेल तर ती माहिती शासनापर्यंत पोहोचवावी.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुन्हा एकदा विधानसभेत भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावर भूमिका मांडली. विकृत भोंदूबाबा अशोक खरात याच्या प्रकरणी काल मी सविस्तर निवेदन दिलं आहे. मी सर्वांना विनंती करेन की, ज्यांच्याकडे या प्रकरणाची माहिती आली असेल तर ती माहिती शासनापर्यंत पोहोचवावी. कारण या प्रकरणाची संपूर्ण माहिती मिळवून त्या व्यक्तीला अशी शिक्षा द्यायची आहे की, अशा पद्धतीने वागणारे लोकं आहेत त्यांना जरब बसली पाहिजे. या प्रकरणाने आपण नेमके कुठे जात आहोत? असा विचार करण्याची वेळ आली आहे, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.आपण नेहमी असं म्हणतो की, आत्मविश्वास (पान २ वर)

# राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनातील बक्षिसांच्या रकमेत वाढ

## राज्यातील विद्यार्थ्यांमधील नवनिर्मितीच्या वृत्तीला चालना देण्यासाठी घेतला निर्णय

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यातील विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक कल्पकता, सर्जनशीलता आणि नवनिर्मितीच्या वृत्तीला चालना देण्यासाठी राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनातील बक्षिसांच्या रकमेत वाढ केली आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून ही सुधारित रक्कम विजेत्यांना दिली जाणार आहे.**



शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या पुढाकाराने १० फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या निर्णयाला मान्यता देण्यात आली होती. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या ध्येयधोरणांना अनुसरून राज्यातील संशोधनाचा दर्जा उंचावणे आणि केंद्र सरकारच्या इन्स्पायर, हॅकेथॉन यांसारख्या स्पर्धांमध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे, हा या निर्णयामागचा मुख्य हेतू आहे. राज्यस्तरीय प्रदर्शनाची प्रक्रिया ही तालुका आणि जिल्हा स्तरावरून सुरू होते, जिथून गुणवंत विद्यार्थ्यांची निवड राज्यस्तरासाठी केली जाते. या प्रवासात विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून बक्षिसांच्या रकमेत सुधारणा करण्यात आली आहे.

नवीन निर्णयानुसार, प्राथमिक व माध्यमिक विद्यार्थी गट, शिक्षक गट आणि (पान २ वर)

### बालवैज्ञानिकाच्या मेहनतीचा सन्मान

आधुनिक भारताच्या उभारणीत आपल्या शालेय विद्यार्थ्यांचा वाटा मोठा असावा, असे आमचे ध्येय आहे. केवळ पुस्तकी ज्ञान न देता मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संशोधनाची वृत्ती जोपासणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीमध्ये संशोधन आणि नाविन्यपूर्ण प्रयोगांना आम्ही प्राधान्य देत आहोत. बक्षिसांच्या रकमेत केलेली ही वाढ केवळ आर्थिक मदत नसून, ती राज्यातील प्रत्येक बालवैज्ञानिकाच्या जिद्दीचा आणि मेहनतीचा केलेला सन्मान आहे.

# लाडक्या बहिणींना फेब्रुवारी, मार्च महिन्याचा हप्ता एकत्र मिळणार ?

प्रतिनिधी । मुंबई

**मार्चअखेर उजाडूनही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा फेब्रुवारी आणि मार्चचा हप्ता रखडल्याने लाभार्थी महिलांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. मात्र, आता दोन्ही महिन्यांचे हप्ते एकाच वेळी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सुरू केली होती. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपयांचे अर्थसहाय्य दिले जाते. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून हप्ता उशिरा मिळत असल्याच्या तक्रारी अनेक महिलांकडून करण्यात आल्या आहेत. यापूर्वी जानेवारीचा हप्ता फेब्रुवारीमध्ये मिळाला होता.

## संपादकीय

### आगामी काळ चिंतेचा !

आखातात युद्ध सुरू झाल्यानंतर सुमारे तीन आठवड्यांनी पंतप्रधानांनी संसदेत आपली भूमिका मांडली. इतके दिवस पंतप्रधान या सगळ्या विषयांवर का गप्प होते याविषयी सातत्याने विचारणा केली जात होती, पण त्याला मोदींनी दाद दिली नव्हती. पण त्यांनी या विषयावर पहिल्यांदाच आपले मत मांडले. मोदींचे संसदेत युद्धविषयक स्थितीवर संबोधन होणार हे जाहीर झाल्यानंतर सगळेच जण त्यांच्या भाषणाकडे डोळे लावून बसले.पंतप्रधान मोदी या संबोधनात भारताची या संकटकाळात नेमकी काय परिस्थिती आहे आणि सरकारची सिद्धता किती आहे याविषयी भाष्य करतील असे अपेक्षित होते, त्याप्रमाणे त्यांनी काही प्रमाणात यावर भाष्य केले पण त्यात काहीच नावीन्य नव्हते. उलट आगामी काळ भारतासाठी किती चिंतेचा आहे याचेच सूतोवाच त्यांनी केले. लोकांच्या पोटात तेव्हा गोळा आला जेव्हा मोदींनी करोना काळाचा उल्लेख केला. कोरोना काळात आपण ज्या संकटाचा सामना केला तशाच पद्धतीच्या संकटासाठी आपल्याला आता तयार राहावे लागेल असा इशारा मोदींनी यावेळी दिला. युद्धामुळे संपूर्ण जगातच मोठी उलथापालथ झाली आहे, त्यामुळे त्याचे परिणाम भारतावरही होणार आहेत. या परिणामाला सामोरे जाण्यासाठी आपल्याला आता एकजुटीने तयारी केली पाहिजे असे ते म्हणाले. पण या संकटाचा सामना करण्यासाठी सरकार काय करीत आहे यावर त्यांनी फार भाष्य केले नाही. एलपीजीचे देशांतर्गत उत्पादन वाढवण्यावर भर दिला जात आहे, इंधनाच्या अखंडित पुरवठ्यासारखी सरकारचे प्रयत्न जारी आहेत, इंधन सुरक्षेसाठी ४१ देशांशी चर्चा सुरू आहे, कच्च्या तेलाचा धोरणात्मक साठा वाढवण्यावर भर दिला जात आहे, देशाच्या रिफायनिंग क्षमतेत वाढ करून ऊर्जा सुरक्षिततेला बळकटी दिली जात आहे वगैरे बाबी मोदींनी नमूद केल्या. पण या केवळ मोघम स्वरूपाच्या होत्या, त्यात नेमकेपणाचा अभाव होता. मुळात देशात इंधन तुटवडा नाही असे सुरुवातीपासून सतत सांगणाऱ्या सरकारने देशाच्या विविध भागात एलपीजी गॅस सिलेंडरचे जे ब्लॅकमार्केटिंग सुरू आहे आणि ठिकठिकाणी ग्राहकांच्या ज्या प्रचंड रांगा लागलेल्या आहेत त्या कशा लागल्या याचे उत्तर दिले पाहिजे. देशात इंधनटंचाई नाही असे सांगता, मग अनेक ठिकाणी कमर्शियल गॅस सिलिंडरचा पुरवठा का बंद करावा लागला, किमती का वाढवल्या याचेही उत्तर सरकारने दिले पाहिजे. एक बाब खरी आहे की जनतेमध्ये गोंधळाची स्थिती निर्माण होऊ नये याची जबाबदारी सरकारवर असते, त्यामुळे इंधनाच्या उपलब्धतेबाबत देशवासीयांना आश्वस्थ करणे ही सरकारची जबाबदारी आहे. त्यामुळे केवळ या धोरणाचा भाग म्हणून सरकारला काही विधायक स्वरूपाची विधाने करावीच लागतात त्यात काही चूक नाही पण सरकार सांगत असलेली स्थिती आणि प्रत्यक्ष मैदानावर असलेली स्थिती यात कमालीचे अंतर जेव्हा दिसते त्यावेळी मात्र जनतेत घबराट निर्माण झाल्याशिवाय राहात नाही. भारताकडे पेट्रोल डीझेलचा नेमका किती दिवस पुरेल इतका साठा आहे याविषयीची स्थितीसुद्धा सरकारकडून कधीच नेमकेपणाने स्पष्ट करण्यात आली नाही. याबाबत सरकारी सूत्राकडून जी जी माहिती उपलब्ध झाली. त्यात बरीच तफावत होती. या सगळ्या आव्हानात्मक स्थितीला सामोरे जात असताना सरकारी यंत्रणांची मोठीच दमछाक झालेली पहायला मिळत आहे. पंतप्रधानांनी करोना काळाचा दाखला दिला. त्या स्थितीचा आपण कसा एकजुटीने मुकाबला केला याचीही आठवण त्यांनी सांगितली, पण कोरोना काळात सरकारचे प्रचंड अपयशच लोकांना पाहायला मिळाले होते. कोणत्याही नियोजनाशिवाय पुकारण्यात आलेला लॉकडाउन, ऑक्सिजन पुरवठ्यासह वैद्यकीय मदत सामग्रीच्या पुरवठ्यात देशभर निर्माण झालेले अडथळे, लसीच्या वाटपाचे फसलेले नियोजन, लॉकडाउनमुळे स्थलांतरित मजुरांना सोसावे लागलेले हाल असे सगळे प्रकार कोरोनाच्या काळात देशाने अनुभवले.

# दीपनगर वीजनिर्मिती प्रकल्पात स्थानिकांना रोजगार द्यावा

## शिवसेनेतर्फे विविध मागण्यांचे मुख्य अभियंत्यांना निवेदन; मागण्या मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी । भुसावळ

**दीपनगर वीज निर्मिती प्रकल्प बाधित क्षेत्रातील सुशिक्षित तरुण स्थानिकांना रोजगार द्यावा, न्यायालयाच्या आदेशानुसार ५० टक्के टन राख परिसरातील छोट्या व्यावसायिकांना शासन दरानुसार मिळावी तसेच राखेमुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर प्रदूषण वाढले आहे. मोठ मोठे बलकर महामार्गावर लावल्यामुळे अपघात होतात. अशा विविध मागण्यांचे निवेदन आज मंगळवार दि. २४ रोजी दीपनगरचे मुख्य अभियंता राजेश मोराडे यांना शिवसेनेतर्फे देण्यात आले. आठ दिवसात वरील मागण्या सोडविण्यात आल्या नाही तर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.**

शिवसेनेतर्फे मुख्य अभियंता यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, न्यायालयाच्या आदेशानुसार प्रकल्प बाधित क्षेत्रातील बेरोजगार तरुणांना रोजगार द्यावा, तसेच छोट्या स्थानिक व्यावसायिकांना ५० टक्के टन राख दरमहा देण्यात यावी. परंतु असे न होता बलाढ्य बाहेरचे मोठे ठेकेदार त्यांचा आपल्या परिसराशी सबंध नसताना राखेचे टेंडर (निविदा) देतात. आणि स्थानिकांना बेरोजगार करतात यामध्ये दीपनगर मधील अधिकाऱ्यांचे ठेकेदार यांच्याशी अर्थपूर्ण संबंध असल्याचे निदर्शनास आले आहे. प्रकल्प बाधित क्षेत्रातील स्थानिक सुशिक्षित बेरोजगार तरुणांना दिपनगर येथे रोजगार मिळत नसल्याने वेल्हाळे बंधातील राख होण्यासाठी बँकेकडून कर्ज घेऊन ट्रॅक्टर खरेदी केली आहे. परंतु बाहेरच्या मोठ्या ठेकेदाराला राखेच ठेका मिळाल्याने स्थानिक तरुणांवर उपासमारीची वेळ आली आहे. काही मोठे ठेकेदार फक्त राजकीय पक्षांच्या मोठ्या नेत्यांच्या फोनवरून ठराविक समाजातील मुलांनाच दीपनगर येथे कामावर घेत असतात आणि दुसऱ्या समाजाच्या बेरोजगार मुलांना कामावर घेत नाही. अशा जातीभेद करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी. महामार्गावर राखेचे मोठे बलकर क्षमतेपेक्षा जास्त दुप्पट भरून काळाबाजार केला जात आहे. महामार्गावर रस्त्यांमध्ये मोठमोठे बल्कर उभे करून वाहतुकीसाठी अडचणी निर्माण होऊन अपघात होतात. तसेच उडणाऱ्या राखमुळे महामार्गावरून जाणाऱ्या मोटरसायकल चालविणाऱ्याच्या डोळ्यात राख जाऊन अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. प्रकल्प बाधित परिसरातील स्थानिक छोटे व्यवसायिकांना धर्म हा ५०% टन राख उपलब्ध करून द्यावी, दीपनगर प्रशासनाने बाहेरच्या ठेकेदाराचा राखेचा



ठेका त्वरित रद्द करण्यात यावा, ठेकेदारांनी सर्व समाजातील बेरोजगार तरुण यांना कामावर घ्यावे, वरील सर्व मागण्या संदर्भात येत्या आठ दिवसात कार्यवाही नाही झाल्यास शिवसेनेतर्फे दिवसात ६६० प्रकल्पासमोरील महामार्गावर महामार्ग थांबून शिवसेना स्टाईलने रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, याप्रसंगी होणाऱ्या परिणामास दीपनगर प्रशासन जबाबदार राहील, असे दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी जेष्ठ शिवसैनिक उपजिल्हाप्रमुख विलास मुळे, भुसावळ विधानसभा प्रमुख संतोष माळी, नगरसेवक राजेंद्र चौधरी, भुसावळ अल्पसंख्यांक विभाग तालुकाप्रमुख पप्पू जकातदार आदी उपस्थित राहून त्यांनी मुख्य अभियंत्यांना निवेदन दिले.

# ओमच्या शिक्षणाचा खर्च जैन फाऊंडेशन करणार

## जीवरक्षक ओम पाटील याचा जैन इरिगेशनतर्फे सत्कार

प्रतिनिधी । जळगाव

**पोहता येत नसतानाही अनेर नदीत आंघोळीसाठी उतरलेल्या चौघासाठी उमेश उर्फ ओम रवींद्र पाटील (वय १४) हा देवदूत ठरला आहे. ओम याच्या धाडसामुळे चौघांचे प्राण वाचले. ओम याच्या या धाडसाची दखल घेत जैन इरिगेशन सिस्टिम व भवरलाल अँड कांताबाई जैन फाऊंडेशनच्यावतीने त्याच्या शिक्षणाचा सर्व खर्च करण्याचा निर्णय जाहीर केला होता. आज (दि.२५ मार्च) ओम पाटील याचा व त्याचा परिवाराचा जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**



यावेळी ओम याच्या भावाचाही शैक्षणिक खर्च उचलण्याचा निर्णय अशोक जैन यांनी जाहीर केला. अनेर नदीत गणपूर ( चोपडा ) येथील चार अल्पवयीन मुले ( वय १६ ) आंघोळीसाठी उतरले होते. त्यांना पोहता येत नसल्याने ते बुडू लागले. मुलांची आरडाओरड ऐकताच जवळच असलेल्या ८ वीत शिकणाऱ्या ओमने क्षणाचाही विलंब न लावता नदीत उडी घेतली. आपल्या जिगरबाज वृत्तीने त्याने एकामागून एक अशा चौघांनाही सुखरूप बाहेर काढले. त्याच्या या अचाट धैर्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. जैन इरिगेशनच्या भवरलाल अँड कांताबाई जैन फाऊंडेशनने ओम याचा सर्व शैक्षणिक खर्च करण्याचा निर्णय जाहीर केला होता. त्यानंतर २५ मार्च रोजी त्याला जैन हिल्स येथे बोलवून त्याचा व आई-वडिलांचा सत्कार केला. यावेळी सोबत परिवारातील सदस्य व ॲड. बाळकृष्ण पाटील ही होते. अशोक जैन यांनी ओम याच्या पालकांशी संवाद साधत त्याच्या धाडसाचे कौतूक केले. ओम याचा भाऊ दिवेश हा अकरावीत शिक्षण घेत आहे, त्याचाही शैक्षणिक खर्च करण्याचा निर्णय जाहीर केला. ओमचे धाडस अफाट आहेच, पण त्याच्यावर झालेले संस्कार त्याहून मोठे आहेत,अशा शब्दांत अशोक जैन यांनी त्याचे कौतुक केले. ओम आठवीच्या वर्गात शिकत आहे. ओमचे वडील रवींद्र पाटील आणि आई सरलाबाई हे शेतमजुरी करतात. त्याची परिस्थिती साधारण आहे. आर्थिक परिस्थितीमुळे मुलांच्या शिक्षणाची त्यांना चिंता होती. परंतु भवरलाल अँड कांताबाई जैन फाऊंडेशनच्या वतीने दोन्ही मुलांच्या शिक्षणाचा खर्च करण्याचा निर्णय घेतल्या गेल्यामुळे पाटील दाम्पत्यांनी समाधान व्यक्त केले.

# एलएनजी तुटवड्यामुळे युरिया टंचाईची शक्यता

प्रतिनिधी । जळगाव

**अमेरिका, इस्त्रायल आणि इराण याच्यातील युद्धामुळे पश्चिम आशियात तणाव निर्माण झाला आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे भारतात  चा तुटवडा निर्माण झाल्याने सर्वसामान्य नागरिकांसह हॉटेल व्यावसायिक अडचणीत आले आहे. युद्धाची झळ सर्वच क्षेत्रांना बसत असताना आता शेतकऱ्यांच्या अडचणी देखील वाढण्याची शक्यता आहे. युद्धामुळे शेतीसाठी अत्यावश्यक असलेल्या युरिया खताच्या टंचाईचे संकट निर्माण होण्याची चिन्हं दिसू लागली आहेत. युद्धामुळे लिक्विड नॅचरल गॅस पुरवठ्यावर परिणाम झाला असून, त्याचा थेट फटका खत उत्पादन क्षेत्राला बसत आहे. त्यामुळे खरीप हंगामापूर्वी खताच्या टंचाईची भीती व्यक्त करण्यात येत आहे.**

युरिया हा खरीप हंगामातील प्रमुख खत असल्याने या टंचाईचा थेट परिणाम शेतकऱ्यांवर होण्याची शक्यता आहे. युरिया खताच्या निर्मितीसाठी एलएनजी हा प्रमुख कच्चामाल म्हणून वापरला जातो. भारतातील १८ हून अधिक खत उत्पादक कंपन्या मोठ्या प्रमाणावर अखाती देश आणि रशिया येथून गॅस किंवा तयार युरियाची आयात करतात. मात्र युद्धामुळे समुद्री वाहतूक विस्कळीत झाली आहे. यामुळे एलएनजीचे दर मोठ्या प्रमाणावर वाढले असून, खत प्रकल्पांना गॅस पुरवठा कमी झाला आहे. परिणामी युरिया उत्पादनाची गती मंदावली आहे. युरियाचे उत्पादन घटल्यास बाजारात खताचा तुटवडा निर्माण होऊन दरवाढ होण्याचीही शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर ऑल इंडिया ॲग्रो इनपुट डीलर असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष मोहन कलंत्री यांनी चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी सांगितले की, एलएनजी तुटवड्यामुळे खत उत्पादनावर परिणाम होत असून, सरकारने तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे.

## पान १ वरुन

**महिला उद्योजिका भारताच्या......**

मिशन अंतर्गत महिला मॉल उभारले जात आहेत. जिल्हास्तरावर उभारल्या जाणाऱ्या या मॉलमध्ये केवळ महिला उद्योजकांच्या उत्पादनांनाच स्थान मिळेल, मध्यस्थांचे जाळे कमी होऊन थेट संधी उपलब्ध होईल आणि त्यामुळे ग्रामीण महिलांच्या उत्पन्नात वाढ होईल, असा विश्वास पणनमंत्री रावल यांनी व्यक्त केला.

**महाराष्ट्रातील पर्यटनाच्या जागतिक....**

अर्थसंकल्पात सुमारे २०९६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

राज्यातील गडकिल्ले, समुद्रकिनारे, धार्मिक स्थळे आणि नैसर्गिक पर्यटन स्थळे जागतिक पर्यटन नकाशावर आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. राज्याचे आंतरराष्ट्रीय स्तरावर ब्रँडिंग करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याचे मंत्री देसाई यांनी सांगितले.महाबळेश्वर आणि पाचगणी येथे आयोजित करण्यात आलेल्या महापर्यटन महोत्सवाला परदेशी पर्यटकांचा प्रतिसाद मिळाल्याचा उल्लेख करत, अशा उपक्रमांमधून महाराष्ट्राची संस्कृती, खाद्यपरंपरा आणि कला जगासमोर मांडण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

**आगीमुळे बाधित पिकांना ......**

भरपाईची तरतूद नाही. शासन या बाबीशी सहमत असून कापलेल्या पिकालाही भरपाई मिळावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

**राज्यस्तरीय विज्ञान......**

प्रयोगशाळा सहाय्यक व परिचर अशा सर्वच श्रेणींमधील विजेत्यांना आता वाढीव रोख रक्कम मिळणार आहे. प्रदर्शनातील प्रत्येक गटातील प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या विजेत्यास ५१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास ३१ हजार रुपये, तृतीय क्रमांकास २१ हजार रुपये आणि चतुर्थ क्रमांकास ११ हजार रुपये रोख देऊन गौरविण्यात येईल. तसेच, पहिल्या तीन क्रमांकांशिवाय उत्तेजनार्थ तीन क्रमांकांसाठी प्रत्येकी १० हजार रुपयांचे पारितोषिक निश्चित करण्यात आले आहे. या निर्णयामध्ये सर्वसमावेशकतेवर भर देण्यात आला आहे. आतापर्यंत दुर्लक्षित राहिलेल्या आदिवासी आणि दिव्यांग प्रवर्गातील द्वितीय, तृतीय, चतुर्थ व उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही ही रोख बक्षिसे लागू करण्यात आली आहेत. या संपूर्ण बक्षीस वितरणासाठी शासनाने एकूण १२ लाख ९६ हजार रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे.

**तृतीयपंथीयांना स्वावलंबनासाठी.....**

हा आहे. पारंपरिक रोजगाराच्या संधी मर्यादित असल्याने अनेक तृतीयपंथीय व्यक्तींना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर त्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवली मदत उपलब्ध करून देणे, हे योजनेचे मुख्य वैशिष्ट्य आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना २५ हजार ते दोन लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाणार आहे. यामध्ये ४५ टक्के शासन अनुदान, ५० टक्के बँक कर्ज आणि पाच टक्के लाभार्थ्यांचा स्वतःचा हिस्सा, असा निधीचा समावेश आहे. यामुळे लाभार्थ्यांवरील आर्थिक ताण कमी होणार असून त्यांना व्यवसाय उभारणीसाठी आवश्यक भांडवल सहज उपलब्ध होणार आहे. उल्लेखनीय म्हणजे कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याजामध्ये ३० टक्क्यांपर्यंत सवलत देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

**अशोक खरातचे अनेक......**

असावा पण अतिआत्मविश्वास असू नये. तसेच आपण सर्व श्रद्धा मानणारे लोकं आहोत. पण श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्यामध्ये खूप छोटी रेघ आहे. ती रेघ ओलांडली जाते तेव्हा काय होतं ते आपण या प्रकरणातून बघितलं आहे. पण एकप्रकारे अंधश्रद्धेत विवेक हरवतो ते आपल्याला या प्रकरणात बघायला मिळालं आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

# २९ मार्चला विशाल हिंदू मेळाव्याचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

जाती-जातीत विखुरलेल्या हिंदू समाजाला संघटित करण्याच्या उद्देशाने जळगाव शहरात येत्या दि.२९ मार्च रोजी एका भव्य मविशाल हिंदू मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सकल हिंदू समाज, श्रद्धा कॉलनी परिसरातील विविध सोसायट्यांच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून श्री. मनोजजी सावंत (जळगाव जिल्हा सहप्रचार प्रमुख, रा. स्व. संघ आणि संचालक, गुरुकृपा क्लासेस) मार्गदर्शन करणार आहेत. तसेच, ह.भ.प. विलास महाराज सायगावकर यांचे आशिर्वचन यावेळी लाभणार आहे. रामानंद नगर परिसरातील चर्च रोड जळगाव येथील श्री गणेश मंदिर परिसर, गजानन सोसायटी परिसर, पारिजात संकुल जवळ येथे हा मेळावा रविवार, दि. २९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजता सुरू होईल.

# पत्रकारांसाठी आजपासून रंगणार क्रिकेट महोत्सव

प्रतिनिधी । जळगाव

**समाजाचा चौथा आधारस्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारांच्या मनोरंजन व कल्याणासाठी एक आगळावेगळा उपक्रम हाती घेत, पत्रकार प्रीमियर लीग पर्व-२ चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दि. २६ ते २९ मार्च दरम्यान सागर पार्क मैदान येथे पार पडणार असून दि. २६ सकाळी ७ वाजता स्पर्धेचा शुभारंभ होणार आहे.**

पत्रकार दिवसरात्र ऊन, वारा, पाऊस आणि थंडीची पर्वा न करता समाजासाठी कार्यरत असतात. मात्र त्यांच्या मनोरंजनाकडे अनेकदा दुर्लक्ष होते. हीच बाब लक्षात घेऊन पत्रकारांमध्ये सुसंवाद, मैत्री आणि खेळाडूवृत्ती वाढविण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत जिल्हाभरातील पत्रकारांचा उत्स्फूर्त सहभाग असून एकूण २६ संघ मैदानात उतरणार आहेत. यामध्ये जिल्ह्यातील १४ संघ, जळगाव शहरातील ५ संघ, संपादकांचा एक संघ तसेच लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, डॉक्टर, वकील, जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व डॉक्टर आणि पोलीस प्रशासनाचे संघ सहभागी होणार आहेत. दि.२६ सकाळी ७ वाजता केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, पालकमंत्री गुलाबराव पाटील , मंत्री गिरीश महाजन, मंत्री संजय सावकारे, खासदार स्मिता वाघ यांच्यासह आमदारांच्या उपस्थितीमध्ये स्पर्धेचा शुभारंभ होणार आहे विशेष म्हणजे, या ४ दिवसीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या कोणत्याही खेळाडूकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. समारोप सोहळ्यात विजेत्या संघांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. ही स्पर्धा यशस्वी व संस्मरणीय करण्यासाठी आयोजकांनी सर्वतोपरी प्रयत्न केले असून जिल्ह्यातील नागरिकांनी उपस्थित राहून स्पर्धेचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय महामार्गावरील कोंडाईबारी घाट ठरतोय मृत्यूचा सापळा

प्रतिनिधी । नवापूर

**तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वरील कोडाईबारी घाट सध्या अपघातांसाठी कुप्रसिद्ध ठरत असून मागील दोन वर्षांपासून येथे अपघातांची मालिका सुरूच आहे. या कालावधीत सुमारे १० ते १२ भीषण अपघात घडले असून अनेक ट्रकचालक व प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. त्यामुळे हा घाट मृत्यूचा सापळा ठरत असल्याची भीती नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.**



या महामार्गाचे बांधकाम संबंधित म्हात्रे कंपनीकडून करण्यात आले आहे. मात्र, कोडाईबारी घाटात रस्त्याचा उतार अत्यंत जास्त प्रमाणात देण्यात आल्याने वाहनांवरील नियंत्रण सुटण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. विशेषतः अवजड वाहने घाट उतरताना वेगावर नियंत्रण ठेवू शकत नसल्याने अपघातांची शक्यता वाढत आहे. अनेक वेळा चालकांचे ब्रेक निकामी होणे किंवा वाहन घसरून दुसऱ्या वाहनावर आदळणे अशा घटना येथे घडत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. या वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर विसरवाडी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक नरेंद्र साबळे यांनी वेळोवेळी महामार्ग अधिकाऱ्यांशी चर्चा करून उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या पाठपुराव्यानंतर काही ठिकाणी दुभाजक उभारण्यात आले होते. त्या काळात अपघातांच्या प्रमाणात काही प्रमाणात घट झाल्याचे दिसून आले. मात्र, सध्या उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये हे दुभाजक झिजल्याने किंवा खराब झाल्याने पुन्हा अपघातांची मालिका सुरू झाल्याचे चित्र दिसत आहे. याशिवाय, घाट परिसरात पुरेशा सूचना फलकांचा अभाव, वेगमर्यादा अंमलबजावणीतील कमतरता, रात्रीच्या वेळी अपुरी प्रकाशव्यवस्था तसेच आपत्कालीन मदतीसाठी आवश्यक सुविधा नसल्यामुळेही अपघातांची तीव्रता वाढत असल्याचे नागरिकांचे मत आहे. काही ठिकाणी वळणदार रस्ता आणि तीव्र उतार यांचा संगम असल्याने वाहनचालकांसाठी हा मार्ग अधिक धोकादायक ठरत आहे. स्थानिक नागरिक, वाहनचालक तसेच सामाजिक कार्यकर्त्यांकडून संबंधित कंपनीविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत असून महामार्गाचे बांधकाम करताना सुरक्षिततेकडे पुरेसे लक्ष देण्यात आले नसल्याचा आरोप केला जात आहे. घाटातील उतार कमी करणे, मजबूत व टिकाऊ दुभाजक उभारणे, वेग नियंत्रणासाठी रंबल स्ट्रिप्स बसविणे, सीसीटीव्ही व सूचना फलक लावणे तसेच आपत्कालीन सेवा अधिक सक्षम करणे अशा विविध उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी मागणी जोर धरत आहे. दरम्यान, प्रशासनानेही या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात आहे. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून भविष्यातील जीवितहानी टाळण्यासाठी त्वरित प्रभावी पावले उचलणे अत्यावश्यक आहे. हे केवळ अपघाती घटना नसून रस्ते सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर इशारा आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# रामनवमीनिमित्त आज भव्य शोभायात्रा

## सार्वजनिक श्रीराम जन्मोत्सव समिती महानगरतर्फे उपक्रम

प्रतिनिधी । जळगाव

**राम नवमीनिमित्त सार्वजनिक श्रीराम जन्मोत्सव समिती महानगरतर्फे दि. २६ मार्च रोजी शहरातील विविध भागातून भव्य शोभयात्रा काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत १८ मंडळांचा सहभाग राहणार आहे.**

आपल्या सर्वांचे आराध्य दैवत प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव सालाबादप्रमाणे अत्यंत जल्लोषात आणि उत्साहाने व समाजातील सर्व घटकांच्या सहभागाने साजरा करण्यात येणार आहे. मुख्य शोभायात्रा गुरुवारी दुपारी ४:३० दक्षिण मुखी हनुमान गोलाणी मार्केट येथून विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या शुभहस्ते महाआरतीने प्रारंभ होऊन पुढील मार्ग नेहरू चौक, टॉवर चौक, कॉंग्रेस भवन, दाणा बाजार, सुभाष चौक, सराफ बाजार मार्गे रथ चौक येथील ग्राम दैवत प्रभू श्रीराम मंदिर येथे समारोप करण्यात येणार आहे. रात्री १०:३० वाजता उद्योगपती अशोक जैन यांच्यासह राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते महाआरतीने शोभायात्रेची सांगता होणार आहे.

**१०० लहान मुलींचे लेझिम पथक राहणार**

या शोभायात्रेत १०० लहान मुलींचे लेझिम पथक सहभागी होणार असून ध्वज संचलन व पालखी, शिव कालीन विविध शस्त्र आखाडा



**या मंडळांचा राहणार सहभाग**

**या मिरवणुकीत छत्रपती बजरंग मित्र मंडळ, शनी पेठ मित्र मंडळ, संकट मोचन मित्र मंडळ, चौका मंडळी, महर्षी वाल्मिक मित्र मंडळ, जय श्रीराम बहुद्देशीय संस्था, शाहू नगर मित्र मंडळ, जय भवानी ग्रुप, शिव प्रतिष्ठान हिंदुस्थान, वीर बाजी प्रभू मित्र मंडळ, सनातन संस्था – हिंदू जनजागृती समिती, भगवा चौक मित्र मंडळ, महाबली वाद्य पथक, शिवसूर्य वाद्य पथक, महर्षी वाल्मिक सांस्कृतिक मंडळ, जगदंबा मित्र मंडळ, कांचन नगर आदी मंडळांचा समावेश राहणार आहे.**

आणि विविध मंडळ, सजीव देखावे, पारंपरिक वाद्य इत्यादी सहभाग घेणार आहे. यंदा छत्रपती बजरंग मित्र मंडळ, शनीपेठ मित्र मंडळ यासह १८ मंडळांचा सहभाग राहणार असून ही भव्य शोभायात्रा जळगाव शहरातील मुख्य मार्गावरुन निघणार आहे.तरी जळगाव शहरातील सर्व रामभक्त महिला व नागरिकांनी सहभागी होत हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन सार्वजनिक श्रीराम जन्मोत्सव समिती जळगाव महानगरतर्फे करण्यात आले आहे.

# मनसेच्या जळगाव जिल्हा संपर्क अध्यक्षपदी गजानन राणे

प्रतिनिधी । जळगाव

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे आक्रमक कामगार नेते आणि कुशल संघटक गजानन राणे यांची जळगाव जिल्हा संपर्क अध्यक्षपदी पुनश्च नियुक्ती करण्यात आली आहे.**



मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जाणारे गजानन राणे आता जळगाव जिल्ह्याच्या पक्षविस्ताराची धुरा सांभाळणार आहेत. त्यांच्या या निवडीमुळे जिल्ह्यातील मनसे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य पसरले आहे. गजानन राणे यांनी यापूर्वी २०१३ मध्ये देखील जळगाव जिल्ह्याचे संपर्क अध्यक्षपद अत्यंत समर्थपणे भूषवले होते. जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार, राजकीय समीकरणे आणि कार्यकर्त्यांशी असलेले त्यांचे जुने ऋणानुबंध पाहता, राज ठाकरेंनी त्यांच्या अनुभवावर पुन्हा एकदा विश्वास टाकला आहे. गजानन राणे यांच्या निवडीबद्दल सर्वच स्तरातून अभिनंदन होत असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली जळगाव जिल्ह्यात मनसेचे संघटन अधिक मजबूत होईल. जिल्ह्याच्या राजकीय आणि सामाजिक संघटनाला यामुळे एक नवी ऊर्जा मिळाली आहे. त्यांच्या अनुभवाचा फायदा जळगाव मनसेला निश्चितच होईल असा विश्वास जिल्हाध्यक्ष ॲड. जमील देशपांडे यांनी व्यक्त केला आहे.

## थोडक्यात

### डॉ. सतीश गोगुलवार यांचे उद्या व्याख्यान

**जळगाव ।** रोटरी क्लब जळगाव व गांधी रिसर्च फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गडचिरोली येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व आरोग्य तज्ज्ञ डॉ.सतिश गोगुलवार यांचे आम्ही आमच्या आरोग्यासाठी विषयावर जाहिर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. दि. २७ मार्च रोजी सायं. ७.३० वाजता रोटरी हॉल, गणपती नगर, जळगाव येथे व्याख्यान होणार असून यावेळी सातपुड्यातील आदिवासी भगिनींनी मोहफुलांपासून बनविलेल्या पौष्टिक पदार्थांचे सादरीकरणही करण्यात येणार आहे. उपस्थितीचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### अर्थसंकल्पात ५२ कोटी ४७ लाखांची वाढ

**जळगाव ।** महानगरपालिकेच्या स्थायी समितीने बुधवारी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा सुधारित १५२५.१२ कोटी रूपयांचा अर्थसंकल्प मंजूर केला. शहराचा रखडलेला विकास आणि जळगावकरांच्या मूलभूत गरजा लक्षात घेता, प्रशासकीय आराखड्यात स्थायी समितीने ५२ कोटी ४७ लाख १७ हजार रुपयांची भरघोस वाढ सुचविली आहे. या अर्थसंकल्पातून रस्ते, गटारी, शिक्षण आणि आरोग्य या चतु:सूत्रीवर सर्वाधिक भर देण्यात आला असून, जळगावचा कायापालट करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. यंदाही कुठलीही करवाढ नाही. खड्डेमुक्त रस्ते, गटारींच्या प्रश्नावर स्थायी समितीने तिजोरी खुली केली आहे. नवीन रस्त्यांसाठी भांडवली खर्चात १५ कोटींची मोठी वाढ सुचवत एकूण ३० कोटींची तरतूद केली आहे.

### शास्ती माफीसाठी आता उरले फक्त ६ दिवस

**जळगाव ।** महानगरपालिकेतर्फे शहरातील मालमत्ता धारकांसाठी लागू करण्यात आलेल्या शास्ती माफी अभय योजनेची मुदत आता संपत आली असून, नागरिकांनी ३१ मार्चपर्यंत या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचे आवाहन महापौर दीपमाला काळे यांनी केले आहे. विशेष म्हणजे, ही शास्ती माफीची शेवटची संधी असून पुढील वर्षी अशी कोणतीही योजना राबविली जाणार नसल्याचे महापौरांनी स्पष्ट केले आहे. जळगाव शहरातील नागरिकांकडून वारंवार होणाऱ्या मागणीचा विचार करून महानगरपालिकेने ५ मार्च ते ३१ मार्च २०२६ या कालावधीसाठी मालमत्ता करावरील शास्ती (दंड) माफीसाठी अभय योजना सुरू केली आहे. ज्या नागरिकांचा मालमत्ता कर थकीत आहे, त्यांना या योजनेअंतर्गत दंडाच्या रकमेत मोठी सवलत मिळत आहे.

# संशयिताकडून आठ तलवारी जप्त!

## अवैध शस्त्रसाठा; जळगाव पोलिसांची मोठी कारवाई

प्रतिनिधी । जळगाव

**खुनाच्या गंभीर गुन्ह्यात हव्या असलेल्या संशयिताला त्याच्या साथीदारासह अटक केली आहे. या कारवाईदरम्यान पोलिसांनी दोन गावठी कट्ट्यांसह आठ तलवारींचा अवैध शस्त्रसाठा जप्त केला आहे. या प्रकरणी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जळगाव पोलिसांनी गुन्हेगारी विरोधात मोठी कारवाई केली आहे.**

पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते आणि उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हापेठ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल वाघ, उपनिरीक्षक गोपाल देशमुख आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली. रामानंदनगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या खुनाच्या गुन्ह्यातील मुख्य संशयित धीरज उर्फ धनंजय दत्तू कोळी हा बऱ्याच दिवसांपासून फरार होता.



त्याचा ेध सुरू असताना जिल्हापेठ पोलिसांना तो जळगाव शहरात फिरत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली होती. त्या आधारे पोलिसांनी शहरात गस्त वाढवून आर. आर. शाळेजवळ सापळा रचला. त्याठिकाणी दोन संशयित दुचाकीवरून जात असताना त्यांना अडवून चौकशी करण्यात आली. यापैकी एका तरुणाने धनंजय उर्फ धीरज दत्तू कोळी (२०, रा. पाळधी, ता. धरणगाव) आणि दुसऱ्याने अजय मारुती डोळे (२३, रा. नेरी दिगर, ता. जामनेर) अशी ओळख दिली. तपासात धीरज कोळी हा खुनाच्या गुन्ह्यातील वॉन्टेड आरोपी असल्याचे स्पष्ट झाले. झडती दरम्यान पोलिसांनी संशयितांकडून सुमारे १५ हजार रुपये किमतीची दुचाकी, ६० हजार रुपये किमतीच्या दोन गावठी कट्टे आणि ४० हजार रुपये किमतीच्या आठ तलवारी, असा मुद्देमाल जप्त केला. या शस्त्र साठ्याचा वापर पुढील गुन्ह्यांसाठी होणार असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. मुख्य संशयित धीरज कोळी याच्यावर यापूर्वीही विविध पोलीस ठाण्यांत गंभीर गुन्हे दाखल आहेत. पुढील तपास उपनिरीक्षक गोपाल देशमुख करीत आहे. दुसऱ्या एका घटनेत काही दिवसांपासून दरोड्याच्या गुन्ह्यात फरार असलेल्या संशयिताला जेरबंद करण्यात नशिराबाद पोलिसांना यश आले. चेतन सूर्यभान पाटील (रा. नशिराबाद) असे अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे.

# जुन्या वादातून एकास लाठ्याकाठ्यांनी मारहाण; आरोपी मोकाट

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील तांबापूर येथील रहिवासी फरदीन सादिल खाटिक याला जुन्या वादातून पाठीवर व छातीवर तसेच कानावर धारदार सुरीने हल्ला करून लाठ्याकाठ्यांनी बेदम मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना २१ रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास शेंदुर्णी येथील मोरवड रोड परिसरात घडली.**

फरदीन खाटिक हा ईद निमित्ताने शेंदुर्णी येथे आपल्या आई-वडिलांना भेटण्यासाठी गेला होता. यावेळी तू येथे का आलास? असा जाब विचारत बाशीत खाटिक, अबरार खाटिक, साहिल खाटिक, सोहिल खाटिक व मुराद खाटिक या पाच जणांनी त्याच्याशी वाद घालत शिवीगाळ केली. त्यानंतर त्यांनी लाठ्याकाठ्यांनी पाठीवर व छातीवर तसेच कानावर धारदार सुरीने हल्ला करून बेदम मारहाण केली. या मारहाणीत फरदीन खाटिक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी पहूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# केसीई इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेन्ट स्वायत्त महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

**खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेन्ट स्वायत्त महाविद्यालयांत वार्षिक स्नेहसंमेलनात अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन विभागातील विद्यार्थ्यांचा उत्साह दिसून आला**

व्यासपीठावर उपस्थित प्रमुख पाहुणे केसीई संस्थेच्या संचालिका डॉ.शिल्पा बेंडाळे, एस एस मणियार विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.वाय.रेड्डी, प्राचार्य डॉ. संजय सुगंधी, प्रा. राहुलकुमार पटेल, प्रा.कल्पेश महाजन, प्रा. गणेश पाटील, प्रा. बी जे लाठी, प्रा. मनीष महाले, प्रा. रेवती पाटील, प्रा.सचिन नाथ यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, विद्यापीठ प्रतिनिधी, महाविद्यालयीन सांस्कृतिक विद्यार्थी प्रतिनिधी यांचे उपस्थितीत दीप्रज्वलन व सरस्वतीपूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी प्रमुख पाहुणे व मान्यवरांचा सत्कार महाविद्यालयतर्फे करण्यात



आला. मान्यवरांचे हस्ते अंतरंग, प्राध्यापकांचे संशोधन पेपर तसेच ट्रेनिंग अँड प्लेसमेंटचे कार्यक्षम अश्या विविध स्मरणिकांचे प्रकाशन करण्यात आले. हे स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि अभ्यासाव्यतिरिक्त कलागुणांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल सादर करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेतला. या स्नेहसंमेलनात मेहंदी, रांगोळी, अंताक्षरी, शाही संस्कृती, साडी व टाय डे, ट्रॅडिशनल डे, सोलो डान्स, ग्रुप डान्स, रॅम्प वॉक, फॅशन शो, फूड स्टाल अश्या विविध प्रकारच्या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महाराष्ट्राच्या लोककलांवर आधारित नृत्य, देशभक्तीपर समूहगीत आणि सामाजिक संदेश देणाऱ्या लघु नाटीका मुख्य आकर्षण ठरल्या. विद्यार्थ्यांनी पाश्चात्य आणि पारंपरिक नृत्याचा सुंदर मिलाफ सादर केला. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात, वर्षभरातील विविध क्रीडा स्पर्धा, वक्तृत्व, वादविवाद आणि शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसे आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुमित भगत, सेजल काबरा, वेदिका चितारे यांनी केले.

# तायक्कांडो स्पर्धेत जैन स्पोर्ट्सची पूर्वा चौधरीला कांस्यपदक

प्रतिनिधी । पाचोरा

**ओडिशा येथे नुकताच झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ तायक्कांडो स्पर्धेत पूर्वा चौधरी हिने महिलांच्या ५३ किलोच्या वजन गटात कांस्यपदक पटकावले. ती जळगाव जिल्हा तायक्कांडो असोसिएशन तथा जैन स्पोर्टस् अकॅडमीची खेळाडू आहे.**

तिला प्रशिक्षक जयेश बाविस्कर तसेच मुख्य प्रशिक्षक अजित घारगे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले आहे. तिच्या या यशाबद्दल जळगाव जिल्हा तायक्कांडो असोसिएशनचे अध्यक्ष अतुल जैन, उपाध्यक्ष ललीत पाटील, सहसचिव रवींद्र धर्माधिकारी, कोषाध्यक्ष सुरेश खैरनार, सदस्य कृष्णकुमार तायडे, महेश घारगे, नरेंद्र महाजन, सौरभ चौबे तसेच जैन स्पोर्टस् अकॅडमीचे अरविंद




देशपांडे यांनी कौतूक केले आहे.

# चार टर्मपासून जळगाव महापालिकेला क्षेत्र सभेचा विसर

प्रतिनिधी । जळगाव

**महानगरपालिकेत गेल्या चार टर्ममध्ये एकदाही क्षेत्र सभा न घेण्यात आल्याचा गंभीर मुद्दा उपस्थित करत मानवी हक्क संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष अमोल कोल्हे यांनी आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे व महापौर दीपमाला काळे यांना निवेदन सादर केले आहे. क्षेत्र सभा न घेणे हे केवळ कायद्याचे उल्लंघन नसून नागरिकांच्या लोकशाही हक्कांवर गदा आणणारे असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.**

कोल्हे यांनी निवेदनात नमूद केले आहे की, भारताच्या संविधानातील ७४व्या घटनादुरुस्ती (पार्ट-आयएक्स-ए) व १२व्या अनुसूचीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकसहभाग, पारदर्शकता आणि विकेंद्रीकरण अनिवार्य करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम २९ (क) व संबंधित शासन नियमांनुसार महानगरपालिका क्षेत्रात क्षेत्र सभा गठीत करून त्यांच्या नियमित बैठका घेणे बंधनकारक आहे. मात्र, जळगाव महापालिकेची स्थापना सन २००३ मध्ये झाल्यापासून आजतागायत चार टर्म पूर्ण होऊनही एकही क्षेत्र सभा घेण्यात आलेली नाही, ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. यामुळे नागरिकांना त्यांच्या प्रभागातील विकासकामे, नागरी सुविधा व स्थानिक प्रश्नांमध्ये थेट सहभागाची संधी नाकारली गेल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सन २०१३ मध्ये याच मुद्द्यावर उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. मात्र तांत्रिक कारणांमुळे या प्रकरणावर अंतिम निर्णय झाला नाही, असेही त्यांनी नमूद केले.



सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या सभागृहात एकूण ७५ नगरसेवकांपैकी ७० नगरसेवक हे सत्ताधारी पक्षाचे असुन महापौर, उपमहापौर व स्थायी समिती सभापती हे देखील त्याच पक्षांचे असल्यामुळे निर्णय प्रक्रियेत एकतर्फी बहुमताचा प्रभाव पडण्याची शक्यता असल्याचे कोल्हे यांनी अधोरेखित केले. लोकशाही संतुलनासाठी क्षेत्र सभा आवश्यक आहे.

# माझे जळगाव, स्वच्छ जळगावचा गुंजला नारा

## महापालिका शाळांच्यावतीने स्थापना दिनानिमित्त जनजागृती रॅली ; विद्यार्थ्यांच्या घोषणांनी चैतन्यमय वातावरण

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव महानगरपालिकेच्या २३ व्या स्थापना दिनानिमित्त शिक्षण विभागाच्या वतीने शहरात मंगळवारी विद्यार्थी रॅलीचे आयोजन करण्यात आले. महापौर दीपमाला काळे यांनी माझे जळगाव, स्वच्छ जळगाव या संकल्पनेवर आधारित या रॅलीद्वारे शहरवासीयांना स्वच्छतेचा संदेश देण्यात आला.**

विद्यार्थ्यांच्या घोषणांनी परिसर दुमदुमला. बळीराम पेठ परिसरातून काढण्यात आलेल्या या रॅलीत रामभाऊ चौबे हायस्कूल, रामभाऊ चौबे कन्या माध्यमिक विद्यालय, महापालिका शाळा क्रमांक १० (उर्दू) आणि शाळा क्रमांक १७ या शाळांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. स्वच्छता पाळा, रोगराई टाळा अशा घोषणा देत आणि हातात प्रबोधनपर फलक घेऊन विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले.रॅलीदरम्यान महापौर दीपमाला काळे यांनी स्वत: नागरिकांशी संवाद साधून कचरा नेहमी कचरापेटीतच टाकण्याचे आवाहन केले. विशेषत: बळीराम पेठेतील भाजी विक्रेत्यांना आपला व्यवसाय



आटोपल्यानंतर सर्व कचरा तातडीने साफ करून कचराकुंडीत टाकण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. शहराच्या सौंदर्यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. रॅलीचा समारोप झाल्यानंतर चौबे शाळांच्या परिसरात विद्यार्थिनींसाठी पिंक कॉर्नर उभारण्यात आला असून, तिथे सॅनिटरी वेंडिंग मशीनचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात सेवानिवृत्त होत असलेल्या शिक्षिका प्रतिभा देशमुख यांचा महापौरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. याप्रसंगी महापौर दीपमाला काळे, महिला व बालकल्याण समिती सभापती सिंधुताई कोल्हे, माजी महापौर व शिवसेनेचे गटनेते विष्णू भंगाळे, भाजप महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, महिला व बालकल्याण समिती सदस्य डॉ. अमृता सोनवणे, विद्या सोनवणे, नगरसेविका मंगलाताई चौधरी, नगरसेवक अनिल अडकमोल, प्रशासन अधिकारी खलील शेख, महिला व बालकल्याण अधीक्षक महेंद्र पाटील, चौबे हायस्कूलचे मुख्याध्यापक सुधाकर पाटील, रामभाऊ चौबे कन्या माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र राजपूत, उर्दू शाळा क्र. १० चे मुख्याध्यापक शेख नईमुद्दीन, शाळा क्र.१७ चे मुख्याध्यापक सचिन बोरसे मंचावर उपस्थित होते. यावेळी माजी महापौर विष्णू भंगाळे यांनी मार्गदर्शन केले.

# चोपडा नगरपरिषदेतर्फे दिव्यांगांना १७ लाखांचे आर्थिक सहाय्य वाटप

## ५२० दिव्यांग लाभार्थ्यांना धनादेश केले वाटप

प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा नगरपरिषदेच्या वतीने दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी शासन निर्देशानुसार आर्थिक सहाय्य वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे आयोजन लोकनियुक्त नगराध्यक्षा नम्रता पाटील व मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या उपक्रमांतर्गत शहरातील एकूण ५२० दिव्यांग लाभार्थ्यांना एकूण १७ लाख २९ हजार ५०० इतक्या रकमेचे धनादेश वितरित करण्यात आले.**




सदर धनादेश दिव्यांग प्रतिनिधी अर्चना राजेंद्र पाटील (महाराष्ट्र राज्य प्रादेशिक महिला अध्यक्ष व नियुक्ती प्रमुख, रुद्र अपंग संघटना, वाशिम) यांनी स्वीकारला. तसेच, जागतिक महिला दिनानिमित्त बचत गटातील महिला तसेच नगरपरिषदेमधील महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांना साडी वाटप करून त्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन स्थानिक प्रशासन व सामान्य प्रशासन विभागाच्या सहकार्याने करण्यात आले होते. कार्यक्रमादरम्यान नगराध्यक्षा नम्रता सचिन पाटील, उपनगराध्यक्ष पंकज बोरोले तसेच नगरसेवक किशोर चौधरी, रमाकांत ठाकुर, तिलक शहा, अमोल पाटील, वंदना बाविस्कर, प्रवीण देशमुख,दीपक पाटील, शे.हनिफ आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना नगराध्यक्षा नम्रता पाटील यांनी दिव्यांग बांधवांच्या अडचणी समजून घेत त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी समाजातील प्रत्येक घटकाने दिव्यांग व्यक्तींना सहकार्य करून त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज व्यक्त केली. या कार्यक्रमास नगरपरिषदेचे सर्व अधिकारी व कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने दिव्यांग नागरिक उपस्थित होते.

## वृद्धाला क्रेनने उडवले अमळनेरात रास्तारोको

प्रतिनिधी । अमळनेर

सायकलसह पादचारी वृद्धाला क्रेनने उडवले, रास्ता रोको अमळनेर । प्रतिनिधी सायकल पायी लोटत घेऊन जाणाऱ्या वृद्धाला मागाहून येणाऱ्या क्रेनने उडवल्याने तो जागीच ठार झाल्याची घटना २४ रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास सिंधी कॉलनिजवळ घडली. दरम्यान सिंधी बांधवांनी वाळूच्या डंपर ने उडवल्याचे सांगत पोलीस प्रशासन आणि प्रवाश्याना वेठीस धरले. जयरामदास धर्मानी नावाचा वृद्ध अमळनेर शहरकडून सिंधी कॉलनिकडे सायकल हातात घेऊन पायी जात असताना एक मोठी क्रेन वेगाने वृद्धाला उडवून पुढे निघून गेला. वाळूच्या डंपरने उडवल्याची अफवा पसरल्याने सिंधी बांधवांनी शव तेथेच ठेवून रास्ता रोको आंदोलन सुरू केले. वाहतुकीची कोंडी झाली. घटनास्थळी पोलिसांनी धाव घेतली असता पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी वाहतूक मोकळी करण्याचे आवाहन केले. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्यात वृद्धाला क्रेनने उडवल्याचे दिसत होते. व्हिडीओ आंदोलकांना दाखवताच मृतदेह शवविच्छेदनासाठी नेण्यात आला.

## अडावद येथे एचपीव्ही लसीकरणाचा शुभारंभ



प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील अडावद प्राथमिक आरोग्य केंद्र व राज्य शासनाने सुरू केलेल्या (गर्भाशयमुख कॅन्सर विरोधी लस) लसीकरणाचा शुभारंभ अडावद येथील सरपंच बबनखा तडवी यांच्या हस्ते करण्यात आला.**

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन भायेकर व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गिरीश गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पवन सुशिर व डॉ.अर्चना पाटील यांनी लसीकरणाचे महत्त्व पटवून दिले. गर्भाशयाचा कॅन्सर एचपीव्ही जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक होणारा कॅन्सरचा प्रकार असून यामध्ये दरवर्षी हजारो महिला कॅन्सरमुळे मृत्यूमुखी पडत आहे. त्यामुळे कॅन्सरला वेळीच आळा घालण्यासाठी १४ ते १५ वर्ष वयोगटातील ( ज्या मुलींनी १४ वा वाढदिवस साजरा केलेला आहे परंतु १५ वा वाढदिवस साजरा केलेला नाही) अशा वयोगटातील मुलींचे पालकांनी त्वरित लसीकरण करून घ्यावे. ही लस पूर्णतः सुरक्षित असून जागतिक आरोग्य संघटनेचे सदस्य असलेल्या १४२ देशांनी ही लस आपल्या राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमात समाविष्ट केलेली आहे. ही लस प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये ४००० पासून ते ६००० रुपयांपर्यंत दिली जात आहे. त्यामुळे शासनाने मोफत दिलेल्या लसीचे डोस मर्यादित उपलब्ध असल्याने त्वरित आपल्या पाल्यांचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन केले आहे.

## थोडक्यात

### इन्स्टाग्रामवरून बदनामी करणाऱ्या विकृतावर गुन्हा

**जळगाव ।** सोशल मीडियावरील ओळखीचा गैरफायदा घेत एका तरुणाने तरुणीचा विनयभंग केल्याची तसेच तिचे बनावट अकाऊंट तयार करून तिची बदनामी केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी सोमवारी एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लातूर येथील रोहित आनंदा राठोड याच्याशी इन्स्टाग्रामवर तरुणीची ओळख झाली होती. या ओळखीचे रूपांतर पुढे मैत्रीत झाले. मैत्रीचा फायदा घेत तिला भुसावळ रोडवरील एका हॉटेलवर बोलावून शरीरसंबंधाची मागणी केली. तिने नकार देताच सोशल मीडियावर बदनामी केली.

### मोबाईल फोन: किरणोत्सर्ग जागरूकतेवर व्याख्यान

**जळगाव ।** येथील बेंडाळे महिला महाविद्यालयात मोबाईल फोन: किरणोत्सर्ग जागरूकता या विषयावर विद्यार्थिनी व शिक्षकांसाठी ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. नारखेडे उपस्थित होते. डॉ. विशाल भारूड यांनी रेडिएशनचे संभाव्य धोके व परिणाम यावर मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील सायन्स असोसिएशन व रिसर्च डेव्हलपमेंट अँड रिसर्च इथिक्स कमिटी यांनी संयुक्तरीत्या केले.

## लैंगिक कामगार महिलांसाठी कायदेविषयक जनजागृती




प्रतिनिधी । चोपडा

**आधार बहुउद्देशीय संस्था, अमळनेर यांच्या वतीने चोपडा येथील रेड लाईट परिसरात लैंगिक सेवा देणाऱ्या संस्था महिलांसाठी लैंगिक कामगारांचे अधिकार या विषयावर विशेष जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.**

या सत्रात मे २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या महत्त्वपूर्ण आदेशाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. ॲड.उमेश मराठे यांनी गुन्हेगारी प्रक्रिया, कायदेशीर संरक्षण तसेच पोलिसांची भूमिका याबाबत स्पष्ट माहिती दिली. तसेच महिलांनी स्वतःची सुरक्षितता कशी जपावी, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. यानंतर ॲड.सुयेश ठाकूर यांनी लैंगिक कामगार महिलांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, अडचणी यावर मार्गदर्शन केले.

## स्वामिनारायण जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी ।अमळनेर

भगवान श्री स्वामिनारायण जयंतीनिमित्त येथील बीएपीएस स्वामीनारायण मंदिरात दि. २४ पासून तीन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. काल २४ रोजी सकाळी ७ वाजता प्रभातफेरी काढून प्रदक्षिणा झाली. शृंगार आरती व प्रवचन होऊन रात्री ८ वाजता सभा प्रवचन झाले. दि. २५ व २६ मार्च रोजी सकाळी प्रभातफेरी व आरती तसेच रात्री ८ वाजता भगवान स्वामिनारायण जयंती उत्सव सभा होणार आहे. तरी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पु. योगीस्नेह स्वामी, पु. अखंडमुनी यांच्याकडून करण्यात आले आहे.

## धरणगावात सिलिंडरचा काळाबाजार

### घरपोच सिलिंडरच्या मागणीसाठी तहसीलदारांना निवेदन

प्रतिनिधी । धरणगाव

**तालुक्यात मोठ्या प्रमाणात सिलिंडरचा काळाबाजार होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून येत आहेत. काही नागरिकांनी जास्तीचा सिलिंडर साठा करून ठेवला आहे तर दुसरीकडे सिलिंडरची खरोखर आवश्यकता असणाऱ्या नागरिकांना मात्र सिलिंडर मिळणे कठीण झाले आहे. गरजू नागरिक सिलिंडर दुप्पट भावाने खरेदी करीत आहेत. तर काही नागरिकांना तासन्तास उन्हा तान्हात सिलिंडर साठी रांगेत उभे राहावे लागत आहे.**



सिलिंडरची अवैध वाहतूक होत असतांना देखील खुलेआम गोडावून वरून सिलिंडर वाटप करण्यात येत आहे. अशी अवैध वाहतूक बंद करून नागरिकांना घरपोच सिलिंडर देण्यात यावे, अशा मागणीचे निवेदन नायब तहसीलदारांना देण्यात आले. निवेदन देतांना नगरसेवक सुनील पंढरीनाथ चौधरी यांच्यासह डॉ.अरुण कुलकर्णी, नगरसेविका हेमांगी किरण अग्निहोत्री, अमित शिंदे, रवींद्र काबरा, दत्ता पाटील, राजू भावसार, प्रसन्न भावे, प्रकाश चौधरी, हरीभाऊ महाजन, यशवंत चौधरी तसेच धरणगावातील इतर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीवर्धमान जैन संघांची नूतन कार्यकारिणी जाहीर

प्रतिनिधी । चोपडा

**श्रीवर्धमान जैन श्रीसंघ चोपडा या संस्थेची वार्षिक बैठक नुकतीच शहरातील संघपती गुलाबचंद देशलहरा यांचे अध्यक्षतेखाली एन. एम. टाटीया स्वाध्याय भवन येथे उत्साहात संपन्न झाली. या वेळी सर्वानुमते नूतन कार्यकारिणी घोषित करण्यात आली.**

बैठकीत मागील दोन वर्षाच्या वार्षिक हिशोब कोषाध्यक्ष दिनेश बरडीया यांनी सभासदांच्या बैठकीत सादर





केला. त्यानंतर आगामी दोन वर्षासाठी नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यात श्री संघाचे संघपती म्हणून विनोद बी. टाटिया, वरिष्ठ उपाध्यक्ष नेमीचंद कोचर, उपाध्यक्ष मनीष चोपडा, महामंत्री आनंद राखेचा व कोषाध्यक्ष संदीप सुराणा यांची निवड करण्यात आली. सूचक प्रा.शांतीलाल बोथरा व अनुमोदक माजी प्राचार्य सुरेश अलीझाड व माजी संघपती माणकचंद चोपडा हे होते. सुनील बरडीया, दीपक राखेचा, कमलेश चोपडा, यांनी सुचविल्याप्रमाणे गुरु महाराजांच्या विहार सेवा व अन्य सेवेसाठी समिती स्थापन करण्यात आली. सदरील बैठकीत जैन संघाचे सर्व सदस्य, युवा मंडळाचे सदस्य समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन कार्यकारिणी सदस्यांचे तालुक्यातील सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

## चोपडा येथील समाजकार्य महाविद्यालयात क्षयरोग जनजागृती

प्रतिनिधी । चोपडा

**भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालयात दि.२४ मार्च रोजी जागतिक क्षयरोग दिनानिमित्त क्षयरोग जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.**




यावेळी विचार मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर, उपप्राचार्य डॉ. आशिष गुजराथी, प्रा.डॉ. राहुल निकम, चोपडा तालुका आरोग्य निरीक्षक विजय देशमुख, तालुका क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक किशोर सैंदाणे, क्षयरोग समन्वयक राहुल सोनवणे, प्रा.डॉ. मारोती गायकवाड, प्रा.डॉ. अनंत देशमुख, प्रा.डॉ. उत्तम सोनकांबळे, प्रा. अनिल बाविस्कर आदी मान्यवर हजर होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रा.डॉ. राहुल निकम यांनी प्रास्ताविकातून क्षयरोग जनजागृतीपर कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. क्षयरोग जनजागृती करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तालुका क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक किशोर सैंदाणे यांनी क्षयरोगाची लक्षणे, क्षयरोग होण्याची कारणे, दुष्परिणाम आणि घ्यावयाची काळजी याबाबत विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

# कर्जाणे-धवली पूल व बोरमळी रस्ता कामे आ.प्रा.सोनवणे यांच्याच प्रयत्नांचे फलित

## रस्ता, पुलाची कामे मंजूर करण्यात माजी आ. लताताई सोनवणे यांनीही घेतला पुढाकार

प्रतिनिधी । चोपडा

**कर्जाणे– धवली पूल व कर्जाणे –बोरमळी रस्ता ही आदिवासी भागात मंजूर झालेली विकास कामे ही माजी आमदार लताताई चंद्रकांत सोनवणे व आमदार प्राध्यापक चंद्रकांत सोनवणे यांच्याच प्रयत्नांनी मंजूर झाले आहेत.**





कर्जाणे- धवली पूल व कर्जाणे –बोरमळी रस्ता ही आदिवासी भागात मंजूर झालेली विकास कामे ही माजी आमदार लताताई सोनवणे व आमदार प्राध्यापक चंद्रकांत सोनवणे यांच्याच प्रयत्नांनी मंजूर झाले आहेत. गेल्या दोन वर्षांपूर्वी म्हणजे जानेवारी २०२३ ला माजी आमदार सौ. लताताई सोनवणे यांनी तत्कालीन आदिवासी विकासमंत्री विजयकुमार गावीत यांना पत्र देऊन आदिवासी घटक रस्ते व दुरुस्ती सुधारणा योजनेअंतर्गत ही कामे मंजुर केली होती.परंतु वनविभागाच्या नाहरकतीअभावी ही कामे प्रलंबीत होती. वनविभागाची नाहरकत मिळाल्यानंतर या कामांवरील निधी शासनाकडे परत गेल्याने या कामांना सुरुवात झाली नव्हती. त्यासाठी या कामांना निधी मिळविण्यासाठी आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांनी आदिवासी विकासमंत्री मा. ना. अशोक उईके साहेब व कक्षाधिकारी यांना सप्टेबर २०२५ व नोव्हेंबर २०२५ ला पत्र व्यवहार करुन या व इतर कामांसाठी निधी मंजुर करून त्याबाबत शासन निर्णय काढणे साठी पाठपुरावा केला. ही कामे मंजुर करण्यासाठी आ. प्रा. चंद्रकांत सोनवणे व माजी आमदार लताताई सोनवणे यांनी वारंवार पाठपुरावा करुन या कामांसाठी निधी मिळविला आहे.

## हातेड खुर्द येथील एकनाथ पाटील विंचूरमधून बेपत्ता

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील हातेड खुर्द येथील एकनाथ मोहन पाटील (वय ५९) हे विंचूर (ता. धुळे) येथून दि.४ मार्च २०२६ रोजी बेपत्ता झाले आहेत.**



एकनाथ पाटील हे बेपत्ता झाल्याची खबर त्यांच्या पत्नी सुरेखा पाटील यांनी धुळे पोलिस ठाण्यात दिली आहे. या खबरीची नोंद ३५/२०२६ नुसार करण्यात आली आहे.

पाच फूट चार इंच उंची, रंग सावळा, केसांची ठेवण साधारण, मराठी आणि अहिराणी भाषा बोलता येतात. अशा वर्णनाचे एकनाथ पाटील विंचूर (ता धुळे )येथून दि.४ मार्चला बेपत्ता झाले आहेत. तशी नोंद धुळे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. ते कुठे आढळून आल्यास धुळे पोलीस ठाण्यात किंवा त्यांच्या गावी कळवण्याचे आवाहन त्यांच्या कुटुंबाने केले आहे. ते बेपत्ता झाल्याने हातेड येथे आश्चर्य व्यक्त होत आहे. ते घरातून स्वतः निघून गेले का? याबाबत गावात तर्कवितर्क लढवले जात आहे.

## मृताच्या वारसदारांना ४० लाखांचे विमा संरक्षण

प्रतिनिधी । पारोळा

**एरंडोल येथील शिवाजी रघुनाथ महाजन यांचा दुर्दैवी मोटार अपघातात मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांना विमा योजनेंतर्गत ४० लाख रुपयांचे आर्थिक संरक्षण बँक तर्फे मिळाले आहे.**



एरंडोल येथील शिवाजी रधुनाथ महाजन यांना एका वाहनाने जोरदार धडक दिल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला होता. त्यांच्या नावावर स्टेट बँक ऑफ इंडिया, पारोळा शाखेत राज्य सरकारी वेतन पॅकेज अंतर्गत खाते होते. या खात्यासोबत महाजन यांना अपघाती विमा संरक्षण योजना लागू होती.

या योजनेंतर्गत त्यांच्या वारसदार असलेल्या त्यांच्या आई इंदुबाई रघुनाथ महाजन व मोठे भाऊ विलास महाजन यांना ४० लाख रुपयांचा धनादेश स्टेट बँक ऑफ इंडिया, पारोळा शाखेतर्फे सुपूर्त करण्यात आला. या मदतीमुळे कुटुंबाला अतिशय कठीण प्रसंगी मोठा आर्थिक आधार अपघाती विमा योजनेमुळे मिळाला आहे.

यावेळी स्टेट बँकेच्या पारोळा शाखा व्यवस्थापक सुकेशनी गेडाम, अभिलाष वाघ, प्रकाश पाटील तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते. बँकेच्या या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांनी कौतुक केले आहे. तर कुटुंबाने आभार मानले आहेत.